अहमदनगर येथील जिल्हाधिकारी कार्यालयाचे बांधकाम करणेबाबत...भाग-२ (उर्वरित कामे)

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- बीएलडी-२०१६/प्र.क्र.१४९/ई-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०६ जुलै, २०१९

संदर्भ:- १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. बीएलडी-३३१४/प्र.क्र.७२/ई-८, दि. ०८/०७/२०१५
२) जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचे पत्र क्र. क्र./सा.प्र./रं.व.का./६६/२०१९ दि. ०५/०२/२०१९
३) शासन परिपत्रक क्र.नियोजन विभाग,ससमा २०१०/प्र.क्र.४८(भाग-१) /का-१४६१, दि. ११/०६/२०१८
४) सार्वजनिक बांधकाम विभागाचे पत्र क्र.बैठक-२०१९/प्र.क्र.४२/इमा-१,दि.१३/०६/२०१९

प्रस्तावना:-

उपरोक्त संदर्भाधिन क्र. १ वरील शासन निर्णयाअन्वये अहमदनगर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीच्या बांधकामापोटी रु. २८००.०० लाख इतक्या रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. आता जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी उपरोक्त संदर्भाधिन क्र. २ वरील पत्राअन्वये अहमदनगर येथील जिल्हाधिकारी कार्यालयाचे बांधकाम करणेबाबत, उर्वरित कामांच्या रु.२४,६४,४३,०७२/- (फर्निचरसहित) इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

अहमदनगर येथील जिल्हाधिकारी कार्यालयाचे बांधकाम करणे भाग-२ (उर्वरित कामे) च्या अंदाजपत्रकाची सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी छाननी करुन सदर प्रस्ताव मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चधिकार समितीसमोर सादर करण्यात आला असता सदर समितीने दि.१०/६/२०१९ रोजी झालेल्या बैठकीत रु.२२.११ कोटीच्या अंदाजपत्रकास मान्यता दिली आहे. त्याअनुषंगाने “अहमदनगर येथील जिल्हाधिकारी कार्यालयाचे बांधकाम करणे -भाग-२ (उर्वरित कामे)” च्या प्रस्तावास सोबत जोडलेल्या सहपत्र “अ” मध्ये दर्शविल्यानुसार रु. २२,११,१८,३१९/- (रुपये बावीस कोटी अकरा लाख अठरा हजार तीनशे एकोणीस फक्त) च्या अंदाजपत्रकानुसार खालील अटींच्या अधीन राहून शासन प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. :-

अटी व शर्ती-

a) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.

b) तांत्रिक मंजूरी देतांना राज्य दरसूचीबाह्य बाबींच्या दराकरिता शासन परिपत्रक क्रमांक -२०१७/प्र.क्र.११/नियोजन-३, दि.११/०४/२०१७ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

c) प्रस्तावातील खरेदीशी संबंधीत बाबींकरिता ई-निविदा प्रणालीचा अवलंब करुन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१६/ प्र.क्र.२१५/ उद्योग-४, दि. २४/०८/२०१७ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या सूचना विचारात घ्याव्यात.

d) प्रत्यक्ष काम करतेवळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय इनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/ तां.क.-१, दि. १०/१/२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी.

e) विषयांकित कामांकरिता सुधारित प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता लागणार नाही , या दृष्टीने विशेष दक्षता घेऊन काम करण्यात यावे.

f) विषयाधीन इमारतीचे यापुर्वी केलेले काम व प्रस्तुत अंदाजपत्रकात नमुद काम यांची व्दिरुक्ती होणार नाही, याबाबत खबरदारी घेण्यात यावी.

२. सदर इमारत बांधकामासाठी येणारा खर्च लेखाशिर्ष "मागणी क्रमांक एच-८ ४०५९ § सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च ०१ कार्यालयीन इमारती ०५१, बांधकाम (०७) जिल्हा प्रशासन (योजनांतर्गत) ५३, मोठी बांधकामे (०७)(०१) मोठी बांधकामे (४०५९ ०७९९), (०७)(०२) आस्थापना खर्च (४०५९ ०८०५), (०७)(०३) हत्यारे व संयंत्र यांचा खर्च (४०५९ ०८१४)" या उद्दिष्टाखाली उपलब्ध असलेल्या अर्थसंकल्पीय अनुदानामधून भागविण्यात यावा.

सदर कामाची सुरुवात सन २०१९-२० या आर्थिक वर्षापासून सुरु होत आहे. उक्त लेखाशिर्षाखाली प्रस्तावित बांधकामाचे वर्षनिहाय खर्चाचे नियोजन पुढीलप्रमाणे राहील.-

आर्थिक वर्ष	या आदेशांतील बांधकामाचा अपेक्षित खर्च (रु. कोटी)	उक्त लेखाशिर्षाखाली सुरु असलेल्या इतर कामांसाठी आवश्यक तरतूद (रु. कोटी)	एकूण मंजूर तरतूद (रु. कोटी)
१.	**२.**	**३.**	**४.**
२०१९-२०	१४.००	५४.४८९०	६४.७१
२०२०-२१	८.११	२६.८३६०	६९.८९

३. उक्त लेखाशिर्षाखाली सुरु असलेल्या कामाच्या वित्तीय नियोजनाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.-

(रु. कोटीत)

अ. क्र.	कामाचे नाव	एकूण अपेक्षित खर्च (रु.)	मागील वर्षा-अखेर झालेला खर्च (रु.) (मार्च-२०१८ अखेरपर्यंतचा खर्च + अर्थसंकल्प २०१८-१९)	चालू वर्षात अपेक्षित खर्च (रु.)	पुढील वर्षासाठी Carry Forward करावयाची तरतूद (रु.)		
१.	२.	३.	४.	५.	६.		
					अ २०२०-२१	ब २०२१-२२	क २०२२-२३
	या योजनेखाली सुरू असलेल्या १७८ कामांसाठी	४९८.३१४७	४०६.०८९१	५४.४८९०	२६.८३६०	२६.१२२६	२४.३४१२

४. सदर मान्यता मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने आणि शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-विअप्र-२०१३/प्र.क्र.-३०/१३/ विनियम, भाग-२, दिनांक १७/०४/२०१५ सोबतच्या वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८ - भाग-पहिला, उपविभाग-पाच मधील अनुक्रमांक १ नियम क्र. १३४ अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारानुसार तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. २०१९/१६, दि.१५/३/२०१९ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०१९०७०८१४५११४५८३१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Manisha Anil Rane

Digitally signed by Manisha Anil Rane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3ae05f3b600583f9600d8b04b6e849927430597b482376d876288748f5e12a0a, cn=Manisha Anil Rane
Date: 2019.07.08 14:57:08 +05'30'

(मनिषा राणे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक .
२. जिल्हाधिकारी, अहमदनगर.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
४. महालेखापाल (लेखा परिक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई

५. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक
६. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा-अहमदनगर
७. सह सचिव/ उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-३), मंत्रालय, मुंबई-३२.
८. सह सचिव/ उप सचिव, नियोजन विभाग, कार्यासन-१४७५, मंत्रालय, मुंबई-३२.
९. सह सचिव/ उप सचिव, वित्त विभाग, (व्यय-९/अर्थ-१२), मंत्रालय, मुंबई-३२.
१०. उपसचिव, ब-१, महसूल व वन विभाग, मुंबई -३२
११. निवड नस्ती, कार्यासन ई-८, महसूल व वन विभाग, मुंबई-३२.

(शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. बीएलडी-२०१६/प्र.क्र.१४९/ई-८,दि. ०६ जुलै, २०१९ चे सहपत्र)

"सहपत्र-अ"

Name of Work: Construction of Collector Office Building at Ahmadnagar (Part-2 Remaining Works) (With Furniture)

RECAPITULATION SHEET

Sr. No.	Items	Cost Rs.
(A)	**Main Civil Works**	
	Sub Total (I)	**0**
	Additional Civil Works	
1	Compound Wall & Gate	61,88,611
2	Internal Roads C.C	1,19,26,821
	Sub Total (II)	1,81,15,432
	Sub Total A (I+II)	1,81,15,432
(B)	**Electrification**	
1	Internal	1,81,79,307
2	External	98,97,301
	Sub Total (B)	2,80,76,608
(C)	Water supply and sanitation (5% based on initial civil work)	75,16,749
(D)	Ancillary Items	
1	Furniture	7,63,05,801
2	Rain water harvesting (Lump-sum)	25,00,000
3	External Toilets	18,30,893
4	Water Main, Storage & Pump House, Borewell etc. (LS)	25,00,000
5	Land Development (LS)	10,00,000
6	Land scaping (L-S)	26,16,796
	Sub Total (D)	8,67,53,490
(E)	Optional items	
1	lifts	2,03,77,816
2	Fire fighting Arrangements	1,68,73,497
3	Air Conditioning	1,13,97,288
	Sub Total (E)	4,86,48,601
(F)	Miscellaneous Items	
1	Contingencies (4% of A+C+D)	44,95,427
2	GST (12% of A+C+D+ Contingencies)	1,40,25,732
3	Price Escalation (10% of A+C+D)	1,34,86,281
	Sub Total (F)	3,20,07,439
	TOTAL COST OF PROJECT= (A+B+C+D+E+F)	

TOTAL COST OF PROJECT= (A+B+C+D+E+F) **Rs. 22,11,18,319**

Say Rs. **2211.18 lakh**